RNI No. MAHBIL/2012/44835
www.dgps.maharashtra.gov.in

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# भाग एक – नाशिक विभागीय पुरवणी

वर्ष - १३, अंक - ३८ ] गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर १९ - २५, २०२४ / भाद्र २८ ते आश्विन ३, शके १९४६ [ पृष्ठे ३७

## प्राधिकृत प्रकाशन

## शासकीय / संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

### नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक ३० ऑगस्ट २०२४

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६*

**शुद्धीपत्र**

क्रमांक टीपीएस-३५१३/१८४/प्र.क्र. ७८/२०१३/नवि-९.–– ज्याअर्थी, जळगाव जिल्ह्याची प्रादेशिक योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे) चे कलम १५ चे उप-कलम *(१)* अन्वये, शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्रमांक टीपीएस-३५८५/१६६/प्र.क्र. १६५/नवि-९, दिनांक १२ नोव्हेंबर १९९९ अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक १ फेब्रुवारी १९९२ पासून अंमलात आली आहे (यापुढे "उक्त प्रादेशिक योजना" असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेतील मौजे कुसुंबे (खुर्द), तहसील जळगाव या गावाच्या परिसर नकाशास शासनाने उक्त अधिनियमाचे कलम २० *(४)* अन्वये अधिसूचना क्रमांक टीपीएस-३५१५/१८४/प्र.क्र. ७८/२०१३/नवि-९, दिनांक १ जानेवारी २०१६ अन्वये त्यातील शर्ती-अटींच्या अधीन राहून मंजुरी दिलेली आहे व सदर मंजूर अधिसूचनेत काही अटींमध्ये टंकलेखनाची चूक झालेली असल्याने त्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, टीपीएस-३५१५/१८४/ प्र.क्र.७८/२०१३/नवि-९, दिनांक १ जानेवारी २०१६ चे अधिसूचनेत खाली दर्शविल्याप्रमाणेच्या दुरुस्त्या करणेस्तव हे शुद्धीपत्रक निर्गमित करण्यात येते व त्यानुसार सदरची दिनांक १ जानेवारी २०१६ रोजीची अधिसूचना सुधारित करण्यात येते.

**शुध्दीपत्र**

जळगाव-भुसावळ प्रादेशिक योजनेतील मौजे कुसुंबे (खुर्द) या गावाच्या परिसर नकाशास मंजुरीबाबत उक्त अधिनियमाचे कलम २० *(४)* अन्वये दिनांक १ जानेवारी २०१६ रोजी निर्गमित अधिसूचनेत पुढीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिसूचनेत प्रसिद्धीप्रमाणे | असे वाचावे |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | **अट क्रमांक १ :** उक्त परिघक्षेत्र नकाशातील रहिवास वापरासाठी प्रस्तावित केलेल्या जागेच्या रेखांकनात, प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीनुसार सोडावयाच्या १० टक्के सक्तीची खुली जागा राखून ठेवणे बंधनकारक राहील. | **अट क्रमांक १ :** उक्त परिघक्षेत्र नकाशातील रहिवास वापरासाठी प्रस्तावित केलेल्या जागेच्या रेखांकनात, प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीनुसार सोडावयाच्या १० टक्के सक्तीच्या खुल्या जागेव्यतिरिक्त १० टक्के जागा सुविधांसाठी (ॲमेनिटी स्पेस) राखून ठेवणे बंधनकारक राहील. |
| २ | **अट क्रमांक २ :** प्रत्येक विकास परवानगीच्या वेळी Airport Authority of India यांचेकडून ना-हरकत दाखला प्राप्त करून घेणे व अशा ना-हरकत दाखल्यातील नमूद अटींचे पालन करणे बंधनकारक राहील. | **अट क्रमांक २ :** परिघक्षेत्र नकाशातील रहिवास वापरासाठी प्रस्तावित केलेल्या जागेतील विकास परवानगीवेळी Airport Authority of India यांचेकडून ना-हरकत दाखला प्राप्त करून घेणे व अशा ना-हरकत दाखल्यातील नमूद अटींचे पालन करणे बंधनकारक राहील. |
| ३ | **अट क्रमांक ३ :** रहिवासी विकासाकरिता परवानगीबाबत प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीनुसार सोडावयाच्या १० टक्के सक्तीच्या खुल्या जागेव्यतिरिक्त २० टक्के जागा सुविधांसाठी (Amenity Space) राखून ठेवणे बंधनकारक राहील. सदर सुविधा क्षेत्रात खुली जागा, उद्यान, मनोरंजन मैदान, क्रीडांगण, क्रीडा संकुल, बगिचा, नित्योपयोगी वस्तूंची दुकाने, पार्किंग लॉट, प्राथमिक आणि माध्यमिक शाळा, क्लिनिक्स, दवाखाना, नर्सरी, हेल्थ क्लब, उप-डाकघर, पोलीस ठाणे, विद्युत उपकेंद्र, बँकांची एटीएम, इलेक्ट्रॉनिक सायबर लायब्ररी, खुली मंडई, कचरापेटी, पाणीपुरवठा व्यवस्था, विद्युत पुरवठा व्यवस्था, मलप्रक्रिया केंद्र, तसेच इतर काही सेवा-सुविधा इ. वापर अनुज्ञेय राहतील. | **अट क्रमांक ३ :** ज्या क्षेत्रासाठी पूर्वी औद्योगिक वापरासाठी परवानगी देण्यात आलेली आहे, त्या मौजे कुसुंबे (खुर्द), गट क्रमांक १७४, १७५, १७६, १७७, १७८ (भाग), १९८, १९९, २००, २०१, २०२, २०३ व २०५ (पै.) येथील क्षेत्राचा रहिवासी विकास करताना प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीनुसार सोडावयाच्या १० टक्के सक्तीच्या खुल्या जागेव्यतिरिक्त २० टक्के जागा सुविधांसाठी (Amenity Space) राखून ठेवणे बंधनकारक राहील. सदर सुविधा क्षेत्रात खुली जागा, उद्यान, मनोरंजन मैदान, क्रीडांगण, क्रीडा संकुल, बगिचा, नित्योपयोगी वस्तुंची दुकाने, पार्किंग लॉट, प्राथमिक आणि माध्यमिक शाळा, क्लिनिक्स, दवाखाना, नर्सरी, हेल्थ क्लब, उप-डाकघर, पोलीस ठाणे, विद्युत उपकेंद्र, बँकांची एटीएम, इलेक्ट्रॉनिक सायबर लायब्ररी, खुली मंडई, कचरापेटी, पाणीपुरवठा व्यवस्था, विद्युत पुरवठा व्यवस्था, मलप्रक्रिया केंद्र, तसेच इतर काही सेवा-सुविधा इ. वापर अनुज्ञेय राहतील. |
| ४ | **अट क्रमांक ४ :** प्रस्तुत परिघक्षेत्र नकाशातील जागेसाठी शुद्ध व पुरेशा प्रमाणातील पाणीपुरवठा तसेच मलनि:सारण, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी पुनर्प्रक्रिया प्रकल्प इत्यादी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी अर्जदार/ विकसक यांची राहील. | **अट क्रमांक ४ :** प्रस्तुत परिघक्षेत्र नकाशातील जागेसाठी शुद्ध व पुरेशा प्रमाणातील पाणीपुरवठा तसेच मलनि:सारण, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी पुनर्प्रक्रिया प्रकल्प इत्यादी पायाभूत सुविधा अर्जदार / विकसकाने स्वखर्चाने उपलब्ध करून घेणे आवश्यक आहे व त्या तशा केल्या आहेत, या बाबत जिल्हाधिकारी, जळगाव यांचे समाधान करतील. |

**शुध्दीपत्र** — *चालू*

| अ. क्र. | अधिसूचनेत प्रसिद्धीप्रमाणे | असे वाचावे |
| --- | --- | --- |
| १ | २ | ३ |
| ५ | **अट क्रमांक ५ :** उक्त अट क्रमांक १ व ३ मध्ये नमूद सोईसुविधा सुयोग्य पोचरस्त्यासह एकत्रितरित्या विकसित करणे अर्जदार / विकसक यांचेवर बंधनकारक राहील. अशा सुविधा जिल्हाधिकारी यांनी ठरवून दिलेल्या मापदंडाप्रमाणे विकसित करणे बंधनकारक राहील. | **अट क्रमांक ५ :** उक्त अट क्र. १ व ३ नुसार ठेवण्यात आलेले सुविधा क्षेत्र जमीन मालक / विकसक यांनी सुयोग्य पोचरस्त्यासह व मूलभूत भू-विकासासह अशा सुविधांचा विकास उर्वरित जमिनींच्या विकासाबरोबरच एकत्रितरित्या करणे बंधनकारक राहील. अशा सुविधा जिल्हाधिकारी यांनी ठरवून दिलेल्या मापदंडाप्रमाणे विकसित करणे व देखभाल करणेही बंधनकारक राहील. अशाप्रकारे सुविधा विकसित केल्याशिवाय विकसकाच्या इतर विकासास भोगवटापत्र प्राप्त होणार नाही व अशा बांधकामापोटी अर्जदारास कोणत्याही स्वरूपात मोबदला देय असणार नाही. सदर सुविधा क्षेत्र कोणत्याही बंधनाशिवाय सर्व जनतेला खुले राहील. मात्र जर जमिनमालकांनी भोगवटापत्र प्राप्त करण्यापूर्वी अशा सुविधा विकसित न केल्यास, सदर सुविधा क्षेत्र जिल्हाधिकारी, जळगाव हे विनामोबदला ताब्यात घेतील. सदर सुविधा क्षेत्र हे विकास नियंत्रण नियमावलीनुसार सोडण्यात यावयाच्या, Recreational Space व्यतिरिक्त असेल. |

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,*

**किरणचंद्र ज्ञा. माळगांवकर,**
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

---

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai - 400 032

Dated 30th August 2024

*The Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966*

**Corrigendum**

No. TPS-3513/184/CR-78/2013/UD-9.– Whereas, the Regional Plan of Jalgaon District (hereinafter referred to as “the said Regional Plan”) has been sanctioned by the Government *vide* Urban Development Department Notification No. TPS-3585/166/CR-165/UD-9, dated 12th November 1991 under sub-section *(1)* of Section 15 of the Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966 (Mah. Act. No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as “the said Act”), and it has come in to force with effect from the 1st February 1992 (hereinafter referred to as “the said Regional Plan”);

Whereas, the Government *vide* Notification No. 3513/184/CR-78/2013/UD-9, dated 1st January, 2016 has sanctioned the Zone Plan of village Kusumbe (kh.), Tahsil Jalgaon in the said Regional Plan subject to conditions mentioned therein and some typographical corrections are required to be

done in the conditions mentioned in the said notification and therefore the corrections as listed herein below are notified by this corrigendum and the notification dated 01st January, 2016 stands modified accordingly.

**Corrigendum**

The corrigendum in the Notification dated 1st January 2016 Published under Section 20 *(4)* of the said Act in respect of sanction of Zone Plan of village Kusumbe (kh.), Tahsil Jalgaon in the Jalgaon-Bhusawal Regional Plan is as below ;

| Sr. No. | As appeared in Notification | To be read as |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| 1 | **Condition No. 1 :** In the layout of said Land, from Zone plan 10 per cent compulsory open space shall be provided as per the prevailing Development Control Regulation for the Regional Plan, Jalgaon. | **Condition No. 1 :** In the Residential layout of Land from the said Zone plan, 10 per cent additional Amenity space in addition to 10 per cent compulsory open space as per the prevailing Development Control Regulation shall be provided. |
| 2 | **Condition No. 2 :** At the time permission, the NOC of Airport Authority of India should be taken. | **Condition No. 2 :** In the land proposed for Residential Purpose in the said Zone plan, at the time of permission, the No- Objection Certificate from Airport Authority of India should be taken and it will be binding to comply the conditions of the said No-Objection Certificate. |
| 3 | **Condition No. 3 :** At the time of Seeking permission for these land the owner should, provide 10 per cent open space 20 per cent area for amenities space. The users likes “Open Space, Park, Garden, Parking Lot, School, Hospital, Nursery, Health Club, Post Office, Police Station, Electric Sub-Station, Bank ATM, Electronic Cyber Library, Open Market, Dustbin, Water & Electric System and all other facilities shall be permissible in such amenity area. | **Condition No. 3 :** The area for which the permission for Industrial use has been granted earlier in addition to 10 per cent compulsory open space as per the prevailing Development Control Regulation, it will be mandatory to provide 20 per cent additional amenity space while residential development of such lands bearing Gat Nos. 174, 175, 176, 177, 178 (part), 198, 199, 200, 201, 202, 203 and 205 (part). The uses like “Open Space, Park, Recreational Ground, Garden, Sports Complex, Parking Lot, Park, Connivance Shopping, Primary and Secondary School, Clinics, Hospital, Nursery Health Club, Post Office, Police Station, Electric Sub- Station, Bank ATM, Electronic Cyber Library, Open Market, Dustbin, Water and Electric System and all other facilities shall be permissible in such amenity area. |

**Corrigendum** – *contd.*

| Sr. No. 1 | As appeared in Notification 2 | To be read as 3 |
|---|---|---|
| 4 | **Condition No. 4 :** It shall be responsibility of owner / developer to provide potable and sufficient water supply, sewerage system and other basic amenities for the said Land. | **Condition No. 4 :** It shall be responsibility of owner / developer to provide potable and sufficient water supply, sewerage system and other basic amenities for the lands in the said Zone Plan and same shall be provided as per the satisfaction of Collector, Jalgaon. |
| 5 | **Condition No. 5 :** In above condition 1 and 3 it shall be responsibility of land owner / developer to develop basis amenities along with approach road as per Collector norms. | **Condition No. 5 :** It will be binding to develop amenities along with proper approach road & basic infrastructure facilities in the Amenity area as kept as per Condition No. 1 and 3 simultaneously while development of remaining area. It shall be responsibility of land owner / developer to develop basic amenities along with approach road as per Collector norms. The occupation certificate shall not be issued for remaining development in the absence of development of amenity space. Compensation of any kind shall not be given to applicant for the construction of such amenity. The such amenity will be open for general public without restriction. If such amenity is not developed before obtaining occupation certificate by the land owner, the possession of such area under amenity space will be taken by Collector, Jalgaon free of cost. This amenity space will be in addition to Recreational Space to be provided as per Development Control Regulations. |

*By Order and in the name of the Governor of Maharashtra,*

**KIRANCHANDRA D. MALGAONKAR,**

Section Officer to Government.

## सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती तथा प्रभारी सहसंचालक, नगररचना यांजकडून

## नगर विकास विभाग

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६*

### अधिसूचना

क्रमांक नावि/प्र.छा.स./प्रा.यो./कलम-२० *(४)*/ग.नं. ७५/४/ मौ. चांदशी, ता. नाशिक/६९.० मी. प्रा.यो. रस्ता/१२०५/२०२४.–- ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यात यापुढे ज्यास "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे) मधील तरतुदीनुसार नाशिक जिल्ह्याची सुधारित प्रादेशिक योजना (यात यापुढे ज्यास "उक्त प्रादेशिक योजना" असे संबोधले आहे) शासनाने दिनांक २१ जून २०१३ रोजी मंजूर केली असून, ती दिनांक १६ सप्टेंबर २०१३ पासून अंमलात आलेली आहे आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेनुसार मौजे चांदशी व जलालपूर, तालुका व जिल्हा नाशिक यांचे सीमेवरील ६९ मीटर रुंद (४५ मीटर + दोन्ही बाजूचे सेवा रस्ते १२ मीटर) प्रादेशिक योजना रस्त्याची रुंदी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचे दिनांक ५ मार्च २०२० चे पत्र क्रमांक ८८५/२०२० नुसार ३० मीटर प्रस्तावित करणेबाबत अभिप्राय दिलेले आहेत ;

आणि ज्याअर्थी, राज्यात मंजूर असलेल्या प्रादेशिक योजनांमध्ये उक्त अधिनियमाचे कलम २० अन्वये वेळोवेळी कराव्या लागणाऱ्या जमीन वापराच्या फेरबदलासंदर्भाने करावयाच्या कार्यपद्धतीबाबत उक्त अधिनियमाचे कलम १५४ अन्वये शासन निर्णय क्रमांक टीपीएस-१८१५/प्र.क्र.४९/१५/नवि-१३, दिनांक ६ मे २०१५ व दिनांक ४ जानेवारी २०१६ अन्वये शासनाने निर्देश दिलेले आहेत (यापुढे ज्यास "उक्त शासन निर्णय" असे संबोधले आहे) व त्या अनुषंगाने शासनाने "प्रस्ताव छाननी समिती" गठित केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त चांदशी व जलालपूर सीमेवरील ६९.० मीटर रुंदीचा रस्ता, खालील अटींच्या अधीन राहून, ३०.०० मीटर रुंद करण्याचे प्रस्तावित असून, त्या अनुषंगाने उक्त प्रादेशिक योजना सुधारित करणे आवश्यक असल्याचे उक्त प्रस्ताव छाननी समितीचे मत झाले होते व यानुसार, उक्त अधिनियमाचे कलम २०, पोट-कलम *(२)* मधील तरतुदीनुसार, उक्त प्रादेशिक योजना सुधारित करणे आवश्यक होते (यापुढे ज्यास "प्रस्तावित फेरबदल" असे संबोधले आहे).

(१) शासन निर्णय दिनांक ४ जानेवारी २०१६ मध्ये नमूद तरतुदीनुसार संपूर्ण क्षेत्रासाठी अधिमूल्य रक्कम भरणे बंधनकारक राहील. तथापि, सदरची अधिमूल्य रक्कम तसेच प्रक्रिया शुल्क हे संबंधित जमीन मालकांकडून कलम २० *(४)* ची अधिसूचना निर्गमित करणेपूर्वी वसूल करणे आवश्यक राहील.

(२) सदर रस्ता आखणीतून मुक्त होणारे क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट होईल.

(३) विषयाधीन जागेचे विकसन करताना व विकासपश्चात तेथील पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था, घनकचरा विल्हेवाट/व्यवस्थापन यांकरिता योग्य ती स्वयंपूर्ण व्यवस्था अर्जदार यांनी करणे आवश्यक राहील.

(४) Rainwater Harwesting तसेच Water Recycling (पाण्याचा पुनर्वापर ) व Solar Energy अशा स्वरूपाच्या संकल्पना सदर जमिनीचे विकसन करताना अंमलात आणण्यात याव्यात.

(५) भूजल खात्याने प्रस्तावित केलेल्या विहिरीसह अन्य पर्यायाद्वारे शुद्ध पाणी पुरेशा प्रमाणात विकसकाने उपलब्ध करणे बंधनकारक आहे.

आणि ज्याअर्थी, शासनाने उक्त अधिनियमाचे कलम १५१, पोट-कलम *(१)* अन्वये निर्णय क्रमांक टीपीएस-१८१५/प्र.क्र. ४९/१५/नवि-१३, दिनांक ११ जून २०१५ नुसार कलम २० *(२)*, २० *(३)* व २० *(४)* खालील अधिकार विभागीय सहसंचालक, नगररचना यांना प्रदान केलेले आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २० चे पोट-कलम *(३)* च्या तरतुदीनुसार सहसंचालक, नगररचना, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील सूचना क्रमांक नावि/प्र.छा.स./प्रा. यो. नाशिक/कलम-२० *(३)*/मौ. चांदशी व जलालपूर, तालुका नाशिक/६९.० मीटर प्रा. यो. रस्ता/३८३, दिनांक २३ मार्च २०२० अन्वये उक्त प्रस्तावित फेरबदलाबाबत सर्व संबंधितांकडून विहित मुदतीत सूचना/हरकती दाखल करणाऱ्यांना सुनावणी देण्याकरिता व त्यावरील अहवाल सादर करण्यासाठी सहायक संचालक, नगररचना, नाशिक शाखा, नाशिक यांना प्राधिकृत करण्यात आले होते ;

आणि ज्याअर्थी, प्राधिकृत अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना, नाशिक यांनी वैधानिक कार्यवाही पूर्ण करून त्यांचा अहवाल सदस्य सचिव यांचेकडे सादर केला आहे. तसेच प्रस्ताव छाननी समितीच्या दिनांक २७ जुलै २०२० रोजीच्या बैठकीत अर्जदार यांनी अधिमूल्य रक्कम जमा केल्यानंतर कलम २० *(४)* ची अंतिम अधिसूचना निर्गमित करण्यास मान्यता देण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, मौजे चांदशी, तालुका व जिल्हा नाशिक येथील गट नंबर ७५/४ मधील जमिनीतील प्रस्तुत सुमारे २३३३.५० चौरस मीटर फेरबदलाखालील क्षेत्र रस्ता सन्मुख असल्याने, त्यांचे क्षेत्रासाठी अधिनियमाचे कलम २० *(४)* अन्वये अधिसूचना निर्गमित करण्याची विनंती जमीन मालक श्री. विश्वास विठ्ठल सावकार व इतर यांनी दिनांक १९ जानेवारी २०२४ रोजीच्या पत्रान्वये केली आहे ;

आणि ज्याअर्थी, सहायक संचालक, नगररचना, नाशिक यांनी पत्र क्रमांक ११२६, दिनांक १० जून २०२४ अन्वये उपरोक्त संबंधित जमीन मालक यांनी प्रकरणी आवश्यक ते प्रक्रिया शुल्क व अधिमूल्य रक्कम शासकीय कोषागारात जमा केले असल्याचे या कार्यालयास कळविलेले आहे.

आता त्याअर्थी, याबाबतीत शासनाने प्रदान केलेल्या उक्त अधिकारानुसार उक्त अधिनियमाच्या कलम २०, पोट-कलम *(४)* अन्वये वर नमूद जमिनीच्या संबंधात, नाशिक शाखा कार्यालयाने भाग नकाशावर दर्शविलेल्या क्षेत्रामधील फेरबदलास खालीलप्रमाणे मंजुरी देत आहे व त्यासाठी उक्त प्रादेशिक योजना मंजुरीची दिनांक २१ जून २०१३ रोजीची अधिसूचना सुधारित करण्यात येत आहे.

उक्त प्रादेशिक योजना मंजुरीच्या अधिसूचनेसोबत जोडलेल्या फेरबदलाच्या अनुसूचीतील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा समावेश करण्यात येत आहे.

**नोंद**

नाशिक जिल्ह्याच्या मंजूर सुधारित प्रादेशिक योजनेतील मौजे चांदशी व जलालपूर, तालुका व जिल्हा नाशिक यांचे सीमेवरील ६९ मीटर रुंद (४५ मीटर + दोन्ही बाजूचे सेवा रस्ते १२ मीटर) प्रादेशिक योजना रस्त्याची रुंदी ३० मीटर इतकी सोबतच्या भाग नकाशात दर्शविल्यानुसार खालील अटींच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

**अटी :**

(१) सदर रस्ता आखणीतून मुक्त होणारे क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट होईल.

(२) विषयाधीन जागेचे विकसन करताना व विकासपश्चात तेथील पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था, घनकचरा विल्हेवाट/व्यवस्थापन यांकरिता योग्य ती स्वयंपूर्ण व्यवस्था अर्जदार यांनी करणे आवश्यक राहील.

(३) Rainwater Harvesting तसेच Water Recycling (पाण्याचा पुनर्वापर ) व Solar Energy अशा स्वरूपाच्या संकल्पना सदर जमिनीचे विकसन करताना अंमलात आणण्यात याव्या.

(४) शुद्ध पाणी पुरेशा प्रमाणात विकसकाने उपलब्ध करणे बंधनकारक आहे.

वरीलबाबत उल्लंघन झाल्यास रेखांकन मंजुरी व अकृषिक परवानगी रद्द करण्यास पात्र राहील.

उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारा नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील.

(१) जिल्हाधिकारी, नाशिक.

(२) सहायक संचालक, नगररचना, नाशिक शाखा, नाशिक.

प्रस्तुत सूचना **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**दिपक वराडे,**
सदस्य सचिव,
प्रस्ताव छाननी समिती तथा
प्र. सहसंचालक, नगररचना, नाशिक विभाग, नाशिक.

नाशिक, २६ ऑगस्ट २०२४.

**BY MEMBER SECRETARY, PROPOSAL SCRUTINY COMMITTEE AND *I/c.* JOINT DIRECTOR OF TOWN PLANNING**

**URBAN DEVELOPMENT DEPARTMENT**

*The Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966*

**Notification**

No. NKDN/P.S.C./R.P. Nashik/Sect. 20 (4)/G.N. 75/4/ Mouze Chandshi, tal. Nashik/69.0 mtrs. R.P. Road/1205/2024.– Whereas, the Government has sanctioned the Revised Regional Plan for Nashik district on dated 21st June 2013 (hereinafter referred to as “the said Regional Plan”) under the provisions of Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as “the said Act”) and has came into force with effect from 16th September, 2013. And whereas, Chief Engineer, Public Works Department, Regional Office, Nashik *vide* Letter No. 885/2020, dated 5th March 2020 has given the recommendation to reduce the width of 69 mtrs. wide (45+12+12) Regional Plan road along the shiv of mouze Chandshi and Jalalpur, taluka and district Nashik to 30 mtrs. ;

and whereas, the Government *vide* Resolution No. TPS-1815/C.R. 49/15/UD-13, dated 6th May 2015 and dated 4th January 2016 (hereinafter referred to as “the said Government Resolution”) has issued the directives under Section 154 of the said Act, regarding the procedure to be followed under Section 20 of the said Act, for making changes in the use of land in the areas of sanctioned Regional Plans, and for that purpose constituted “Proposal Scrutiny Committee” ;

and whereas, the “Proposal Scrutiny Committee” constituted under the said Government Resolution, is of the opinion that, the said 69 mtrs. wide Regional Plan road is proposed to be 30 mtrs. wide and the land so released from the road alignment shall be included in the adjacent land use zone, in accordance with the provisions of sub-section *(2)* of Section 20 of the said Act, subject to the following conditions (hereinafter referred to as “the Proposed Modification”) ;

(1) It shall be binding to deposit the premium amount as mentioned in Government Resolution dated 4th January 2016. The premium and Scrutiny fee shall be collected from the concerned land owners before issue of Notification under Section 20 *(4)* of the said Act.

(2) The land so released from the road alignment shall be included in the adjacent land use zone.

(3) Applicant / Developer shall make necessary self contained arrangements to provide Water Supply, Waste Water Treatment, Solid Waste Disposal / Management while developing the said Land and after development of the said Land at his own cost.

(4) It shall be necessary to develop the concept like Rainwater Harvesting, Water Recyling and Solar Energy while developing the said Land.

(5) It is binding on the land developer to make available the pure water.

and whereas, as per the provision of sub-section *(1)* of Section 151 of the said Act, Government *vide* Notification No.TPS-1815/CR-49/15/UD-13, dated 11th June 2015 has delegated the powers under Sections 20 *(2)*, 20 *(3)* and 20 *(4)* of the said Act to the concerned Joint Director of Town Planning;

and whereas, in accordance with the provisions of sub-section *(3)* of Section 20 of the said Act, Joint Director of Town Planning, Nashik Division, Nashik *vide* Notice No. NKDN/P.S.C./R.P. Nashik/Sect.20 (3)/Mouze Chandshi and Jalalpur, taluka Nashik/69.0 mtrs. R.P. Road/383, dated 23rd March 2020 has published, the notice regarding the Proposed Modification and Assistant Director of Town Planning, Nashik Branch, Nashik was appointed to hear the suggestions/objections received within the stipulated period ;

and whereas, the Appointed officer *i.e.* Assistant Director of Town Planning, Nashik Branch has submitted his report to the Member Secretary; also the Proposal Scrutiny Committee, in the meeting dated 27th July 2020 accorded approval to this proposal and directed Member Secretary to issue the final Notification according to sub-section *(4)* of Section 20, after payment of the premium by the Applicant ;

and whereas, the land bearing Gat No. 75/4 of Mouje Jalalpur, taluka and district Nashik area admeasuring about 2333.50 sq. mtrs. are fronting on the said Road under modification and the owner of the said Land Mr. Vishwas Vitthal Savkar and others *vide* their letter dated 19th January 2024 has requested to issue the Notification under Section 20 *(4)* ;

and whereas, the Assistant Director of Town Planning, Nashik Branch, Nashik *vide* his letter No. 1126, dated 10th June 2024 informed this office that, the concerned owner has submitted the required scrutiny fee and premium amount in the Government Treasury.

Now, therefore, in exercise of powers conferred by sub-section *(4)* of Section 20 of the said Act, Joint Director of Town Planning, Nashik Division, Nashik here by sanctions the said Modification for the land shown by the Nashik Branch Office on the part plan and for that purpose amends the aforesaid Notification dated 21st June 2013 as follows.

In the said Regional Plan, the following new entry shall be added after the last entry of the Schedule of Modifications.

**Entry**

In the sanctioned Revised Regional Plan of Nashik district the 69 mtrs. wide Regional Plan Road shown on the boundary of Chandshi and Jalalpur, taluka and district Nashik is reduced to be 30 mtrs. wide and the land so released from the road alignment shall be included in the adjacent land use zone as shown on the part plan, subject to the following conditions.

**Conditions :**

(1) The land so released from the road alignment shall be included in the adjacent land use zone.

(2) Applicant / Developer shall make necessary self contained arrangements to provide Water Supply, Waste Water Treatment, Solid Waste Disposal / Management while developing the said Land and after development of the said Land at his own cost.

(3) It shall be necessary to develop the concept like Rainwater Harvesting, Water Recyling and Solar Energy while developing the said land.

(4) It is binding on the land developer to make available the pure water.

In case of Non-Compliance, Layout Approval and Non-Agricultural permission shall liable to be cancelled.

The Part Plan showing the above said sanctioned Modification shall be kept open for information of General Public during office hours on all working days at the following offices :

(1) The Collector, Nashik.

(2) The Assistant Director of Town Planning, Nashik Branch, Nashik.

This Notice is also be available on website **www.dtp.maharashtra.gov.in**.

**DIPAK VARADE,**
Member Secretary,
Proposal Scrutiny Committee and
*I/c.* Joint Director of Town Planning,
Nashik Division, Nashik.

Nashik, 26th August 2024.

## संचालक, नगररचना यांजकडून

### नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६*

### आदेश

क्रमांक डी.टी.पी./वि.यो. राहाता/कलम १२७ *(२)*/आदेश/प्र.क्र. ७१८/टीपीव्ही-४/४४०३/२०२४.—ज्याअर्थी, राहाता नगरपरिषद हद्दीची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिले आहे) चे कलम ३१ *(१)* मधील तरतुदींनुसार महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस-१६९७/११९०/प्र. क्र. १३०/नवि-०९, दिनांक १६ ऑगस्ट २००४ अन्वये मंजूर केली असून, ती दिनांक १५ सप्टेंबर २००४ पासून अंमलात आलेली आहे (यापुढे "उक्त मंजूर विकास योजना"असे संबोधिलेले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेतील, मौजे राहाता, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर येथील सर्व्हे नंबर १७९/६ या जमिनीचे क्षेत्र आरक्षण क्रमांक ४५ "बगीचा" (यात यापुढे "उक्त आरक्षण" असे संबोधिले आहे) आरक्षणाने बाधित होत आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाचे भूसंपादन व विकासासाठी समुचित प्राधिकरण हे नगरपरिषद, राहाता (यापुढे "उक्त समुचित प्राधिकरण" असे संबोधिले) आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त आरक्षण अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षांच्या कालावधीत उक्त आरक्षणाखालील जमिनीचे संपादन केलेले नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाने बाधित होणाऱ्या मौजे राहाता, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर येथील गट नंबर १७९/६ या जमिनीमधील क्षेत्राबाबत (यापुढे "उक्त जमीन" असे संबोधिले आहे) उक्त जमिनीच्या जमीन मालकाने (यापुढे "उक्त जमीन मालक" असे संबोधिले आहे) दिनांक ४ सप्टेंबर २०१९ रोजी उक्त समुचित प्राधिकरणावर उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(१)* च्या तरतुदीन्वये सूचना (यापुढे "उक्त सूचना" असे संबोधिले आहे) बजावलेली असून ती उक्त समुचित प्राधिकरणास दिनांक ६ सप्टेंबर २०१९ रोजी प्राप्त झाली होती ;

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकानंतर उक्त समुचित प्राधिकरणाने, विहित मुदतीत उक्त आरक्षणाखालील उक्त जमीन संपादित केली नाही अथवा उक्त जमिनीचे संपादन करण्यासंबंधी उक्त अधिनियमाच्या कलम १२७ *(१)* मधील तरतुदीनुसार आवश्यक ती उपाययोजना करण्यात आलेली नाही ;

आणि ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठाने उक्त जमीन मालकाने दाखल केलेल्या रिट याचिका क्रमांक ११११८३/२०२१ मध्ये दिनांक २३ मार्च २०२३ अन्वये उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत ठरविल्याचे आदेश पारित केले आहेत ;

आणि ज्याअर्थी, सहायक संचालक, नगररचना, अहमदनगर शाखा, अहमदनगर यांचेकडील पत्र क्रमांक २७९८, दिनांक ३ ऑगस्ट २०२३ अन्वये उक्त आरक्षणाने बाधित होणारे क्षेत्र दर्शविलेला उक्त जमिनीचा मोजणी नकाशा सादर केला आहे आणि प्रकरणी उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(२)* चे तरतुदीन्वयेची अधिसूचना निर्गमित करणे योग्य होणार असल्याचे कळविले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ चे उप-कलम *(१)* चे तरतुदीनुसार उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाले असून, उक्त अधिनियमाच्या कलम १२७ चे उप-कलम *(२)* चे तरतुदीनुसार, उक्त जमीन मालकाच्या उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाल्याबाबत आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाचा निर्णय क्रमांक टीपीएस-१८१३/३२११/प्र.क्र. ५०८/नवि-१३, दिनांक १ डिसेंबर २०१६ अन्वये सर्व नियोजन प्राधिकरण असलेल्या नगरपरिषदा / नगरपंचायती आणि जिल्हा परिषद यांच्या विकास योजनासंबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(२)* चे तरतुदीन्वये कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार उक्त अधिनियमाच्या कलम १५१ चे तरतुदीन्वये संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(२)* चे तरतुदीन्वये संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे या आदेशान्वये खालील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाले आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेत.

**परिशिष्ट**

| नगरपरिषद, मौजे, तालुका व जिल्हा | उक्त मंजूर विकास योजनेतील आरक्षण व विकास योजना अहवालानुसार अंदाजे क्षेत्र | उक्त सूचनेखालील उक्त जमिनीचा तपशील | उक्त आरक्षणाचे व्यपगत झालेले अंदाजे क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| राहाता नगरपरिषद, मौजे राहाता, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर. | आरक्षण क्रमांक ४५- "बगीचा", (क्षेत्र १९२५० चौरस मीटर). | सर्व्हे नंबर १७९/६ | ९००.०० चौरस मीटर |

**टिपा.–** (१) उक्त आरक्षणातून मुक्त झालेली उक्त जमीन ही लगतच्या जमिनीवर व मंजूर विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकास उपलब्ध होईल.

(२) उक्त आरक्षणातून मुक्त झालेल्या उक्त जमिनीचे क्षेत्र दर्शविणाऱ्या उक्त मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा मुख्याधिकारी, राहाता नगरपरिषद, राहाता, जिल्हा अहमदनगर यांच्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ १ महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

(३) सदर आदेश संचालनालयाच्या **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अविनाश भा. पाटील,**
संचालक, नगररचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे, १४ ऑगस्ट २०२४.

---

## BY DIRECTOR OF TOWN PLANNING

### Town Planning and Valuation Department

*Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966*

## ORDER

No. D.T.P. / D.P. Rahata / Sec.127 *(2)* / Order / C.R. No. 718 / TPV-IV / 4403 / 2024.– Whereas, the Development Plan of Rahata Municipal Council has been sanctioned under the provisions of Section 31 *(1)* of the Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966 (Mah. Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") by the Government of Maharashtra in Urban

Development Department *vide* it's Notification No. TPS-1697/1190/CR-130/UD-09, dated 16th August 2004 and the same has come into force with effect from 15th September 2004 (hereinafter referred to as "the said sanctioned Development Plan") ;

and whereas, as per the sanctioned Development Plan land bearing Gat No. 179/6 of Mouze Rahata, taluka Rahata, district Ahmednagar is affected by Reservation namely Site No. 45- "Garden" (hereinafter referred to as "the said Reservation") ;

and whereas, the Appropriate Authority for the acquisition and development of the said Reservation is Municipal Council, Rahata (hereinafter referred to as "the said Appropriate Authority") ;

and whereas, the land under the said Reservation has not been acquired by the said Appropriate Authority within 10 (ten) years from the date on which the said Reservation came into force;

and whereas, the owner of the said Land (hereinafter referred to as "the said Land Owner") affected by the said Reservation in respect of the land bearing Gat No. 179/6 of Mouje Rahata, taluka Rahata, district Ahmednagar (hereinafter referred to as "the said Land") had served a Notice dated 4th September 2019 under the provisions of Section 127 *(1)* of the said Act (hereinafter referred to as "the said Notice") to the said Appropriate Authority which was received by the said Appropriate Authority on 6th September 2019 ;

and whereas, the said Land under the said Reservation is not acquired or no steps for acquisition of the said Land as required under the provisions of Section 127 *(1)* of the said Act have been taken by the said Appropriate Authority, within a stipulated period after the date of service of the said Notice ;

and whereas, the Hon'ble High Court, Mumbai, Bench at Aurangabad has passed an Order dated 23rd March 2023 in the Writ Petition No. 11183/2021 filed by the said Land Owners ;

and whereas, the Assistant Director of Town Planning, Ahmednagar Branch, Ahmednagar *vide* letter No. 2798, dated 3rd August 2023 has submitted the sanctioned layout of the land showing the area affected by the said Reservation and accordingly, informed that it would be appropriate to issue the notification under the provisions of Section 127 *(2)* of the said Act ;

and whereas, in accordance with the provision of Section 127 *(1)* of the said Act, the said Reservation on the said Land has lapsed, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, it is necessary to issue an Order under the provisions of Section 127 *(2)* of the said Act, regarding the lapsing of the said Reservation on the said Land of the said Land Owner ;

and whereas, the Government in Urban Development Department under the provisions of Section 151 of the said Act *vide* Resolution No.TPS-1813/3211/CR- 508/UD-13, dated 1st December 2016 has delegated the powers exercisable by it to take action under the provisions of Section 127 *(2)* of the said Act to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune in respect of Development Plans of all Municipal Councils / Nagarpanchayats and Zilha Parishads as a Planning Authority.

Now therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune by this Order and as mentioned in the schedule hereinafter hereby notifies the lapsing of the said Reservation in respect of the said Land in the said sanctioned Development Plan under the provision of Section 127 *(2)* of the said Act and for that purpose amends the said Notification as follows :–

**Schedule**

| Municipal Council, Mouje, taluka and district | Reservation of the said sanctioned Development Plan and it's Approximate Area as per D. P. | Description of the said Land under the said Notice | Approximate Area of the lapsed from the said Reservation |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 (sq. mtrs.) |
| Municipal Council, Rahata, mouje Rahata, taluka Rahata, district Ahmednagar. | Res. No. 45–, "Garden", (Area 19250 Sq. mtrs.) | Survey No. 179/6. | 900.00 sq. mtrs. |

**Notes –** (1) The said Land so released from the said Reservation shall become available to the said Land Owner for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said sanctioned Development Plan.

(2) A copy of the part plan of the said sanctioned Development Plan showing the area of the said Land which is lapsed from the said Reservation, is available in the Office of the Chief Officer, Municipal Council, Rahata, district Ahmednagar during Office hours on all working days for inspection to public up to One month.

(3) This Order shall also be published on the Directorate's official website **www.dtp.maharashtra.gov.in**

**AVINASH B. PATIL,**

Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune, 14th August 2024.

---

## जिल्हाधिकारी यांजकडून

### अधिसूचना

क्रमांक जमीन-१/कावि/३३/१६/९/२०२३-२४.— ज्याअर्थी, महसूल व वन विभागाकडील शासन अधिसूचना क्रमांक टीएलसी-२०७६/६३९२३/एम-६, दिनांक १ जुलै १९७६ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१) चे कलम ४ पोट-कलम *(१)* च्या परंतुकाखालील राज्य शासनास असलेल्या ज्या शक्ती मला प्रदान प्रत्यायोजित करण्यात आल्या आहेत. त्याअर्थी आता त्यांचा वापर करून, मी, आयुष प्रसाद, जिल्हाधिकारी, जळगाव जी अधिसूचना काढण्याचे योजित आहे. या अधिसूचनेचा मसुदा उक्त कलम ४, पोट-कलम *(१)* अन्वये आवश्यक केल्याप्रमाणे त्याद्वारे परिणाम होण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि याद्वारे अशी सूचना देण्यात येते की, दिनांक १३ सप्टेंबर २०२४ रोजी किंवा त्यानंतर मी, आयुष प्रसाद, जिल्हाधिकारी, जळगाव उक्त मसुदा विचारात घेईल. सबब, उक्त तारखेपूर्वी ज्यांना कोणाला हरकत घ्यावयाची असेल किंवा सूचना करावयाची असेल त्यांनी सदरची हरकत किंवा सूचना योग्य त्या कारणांसह लेखी स्वरूपात जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव येथे दाखल करावी.

## अधिसूचनेचा मसूदा

महसूल व वन विभागाकडील शासन अधिसूचना क्रमांक टीएलसी-२०७६/६३९२३/एम-६, दिनांक १ जुलै १९७६ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१) चे कलम ४, पोट-कलम *(१)* चे खंड (पाच) आणि (सहा) व पोट-कलम *(१)* चे परंतुकाखाली राज्य शासनास असलेल्या ज्या शक्ती मला प्रदान प्रत्यायोजित करण्यात आल्या आहेत. त्यांचा वापर करून मी, आयुष प्रसाद, जिल्हाधिकारी, जळगाव याद्वारे दिनांक २८ ऑगस्ट २०२४ पासून जळगाव जिल्ह्याच्या रावेर तालुक्यातील शिंदखेडे या गावाचे महसुली गावात रूपांतरित करीत आहे. या गावाच्या हद्दीत खालीलप्रमाणे अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेल्या जमिनी राहतील.

## अनुसूची

| गावाचे नाव | भूमापन क्रमांक | तालुका | जिल्हा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
